Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, Kolhapur Divisional Board, Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर -४१६००४

Ph No. 0231-2696101/2696102/2696103 Email: divsec.kop@gmail.com
WebSite : www.sscboardkolhapur.in

महत्वाचे / परीक्षा प्राधान्य

क्र.कोविमं/ माध्य.गोप /उ.प.तपासणी/ 3513
दिनांक : ०१/१०/२०२६
01 OCT 2026

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा
जिल्हा सातारा,सांगली,कोल्हापूर

**विषय :** माध्यमिक शालांत प्रमाणपत्र [ इयत्ता १० वी ] परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२७ च्या परीक्षेस परीक्षक/नियामक नेमणुक तसेच प्रात्यक्षिक परीक्षेसंदर्भात शिक्षक माहिती पाठविणेबाबत

उपरोक्त विषयास अनुसरुन माध्यमिक शालांत प्रमाणपत्र [ इयत्ता १० वी ] फेब्रुवारी/मार्च २०२७ मध्ये घेण्यात येणा-या परीक्षेसाठी उत्तरपत्रिकांची तपासणी कामासाठी परीक्षक / नियामक नेमणूकीच्या अनुषंगाने आपणाकडून या पत्रान्वये प्राप्त झालेल्या शिक्षक माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेली शिक्षक माहिती / यादी या पत्रासोबत आपणास पाठविण्यात येत आहे. उपरोक्त पॅनेल सोबत आपल्या शाळेतील आपण नोंदविलेल्या कार्यरत सर्व शिक्षकांची माहिती UDISE वरून घेतली आहे. त्याची संगणकीय यादी मूळ पॅनेलसोबत जोडली आहे. म्हणजेच मूळ पॅनेल व UDISE वरून घेतलेली यादी असे दोन पॅनेल संगणकीय याद्या देण्यात येत आहेत. आपण दोन्ही याद्यांची पडताळणी करावी व मूळ पॅनेल मध्ये UDISE यादीतील ज्या शिक्षकांची नोंद नाही त्या शिक्षकांची नावे नव्याने मूळ पॅनेलमध्ये लाल शाईने नोंदवावी. यामध्ये नवीन नावे नोंदविताना अनुक्रमांक, विषय, विषय कोड, माध्यम, शिक्षकांचे नाव, सेवानिवृत्ती दिनांक, बँक खातेक्रमांक व IFSC CODE, मोबाईल क्रमांक Teaching Experience, परीक्षक टर्न, नियामक टर्न व Teacher Type (A,B,C,D) हे नोंदवून संबंधित शिक्षकांची स्वाक्षरी घ्यावी.

UDISE यादीमध्ये ज्या माध्यमिक शाळांना कनिष्ठ महाविद्यालय संलग्न आहेत अशा शाळांची इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी शिक्षकांची UDISE संगणकीय यादीमध्ये एकत्रित माहिती आहे. आपण ती माहिती मूळ पॅनेलमध्ये नोंदविताना माध्यमिक व उच्च माध्यमिक निहाय वर्गीकरण करून अचूक नोंदवावी. कोणत्याही परिस्थितीत एकाही शिक्षकांचे नाव UDISE यादीतील मूळ पॅनेलमध्ये नोंदवायचे शिल्लक राहणार याची दक्षता घेण्यात यावी. पॅनेलमध्ये कोणतीही दुरूस्ती असेल ती लाल शाईने दर्शवावी. याबाबत पुढील सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

1. यादीतील शिक्षकांचे संपूर्ण नाव (इंग्रजी स्पेलिंगसह) त्याचबरोबर शिकवित असलेले विषय आणि माध्यम इत्यादी सर्व माहिती बरोबर आहे का याची खात्री करावी
2. **आपल्या शाळेमध्ये कार्यरत असलेल्या सर्व विषय शिक्षकांची नांवे सोबतच्या यादीत समाविष्ठ असणे आवश्यक असल्याने यासंदर्भात शाळाप्रमुख म्हणून सर्वस्वी मुख्याध्यापक जबाबदार राहतील.** यादीमध्ये एखाद्या शिक्षकाचे नाव समाविष्ठ नसल्यास ते समाविष्ठ करावे. तसेच तात्पुरत्या / तासिका तत्वावरील शिक्षकांचेदेखील संपूर्ण नावासह शिकवीत असलेला विषय, माध्यम, परीक्षक/नियामक टर्न, सेवानिवृत्ती दिनांक व मोबाईल नंबर, बँक खाते क्रमांक, IFSC Code इ. माहिती नोंदवून नावांसमोर संबंधितांची स्वाक्षरी घेण्यात यावी.
3. यादीतील शिक्षकांची आपल्या शाळेतून अन्य शाळेत बदली झाली असेल अथवा अन्य शाळेतून बदलीने आपल्या शाळेत नियुक्ती झालेल्या अशा शिक्षकांच्या नावासमोर बदली शाळेचे नाव व शाळा सांकेतांक **लाल शाईच्या पेनने** नोंदी कराव्यात.
4. एखादा शिक्षक एका पेक्षा अधिक विषय शिकवीत असेल तर कोणत्या विषयाचे पेपर तपासणेस हवे आहेत ते ठळकपणे नमूद करावे.

5. मे २०२७ पूर्वी सेवानिवृत्ती होणारे विषय शिकवीत नसलेले तसेच अभ्यासमंडळ सदस्य , कॅन्सर/ हदयरोग / टी.बी. अशा आजाराने पिडीत असलेल्या शिक्षकांच्या नोंदी ठळकपणे करणे आणि त्यासंदर्भात आवश्यक पुरावा जोडणे अनिवार्य आहे.

6. यापूर्वी प्रमुख नियामक [ C.M.] म्हणून काम केलेल्या शिक्षकांनी त्यांची परीक्षक/नियामक म्हणून काम करण्याची तयारी दर्शविली असेल तर तसे त्यांच्या नावासमोर नोंद करावी. त्याचबरोबर एखाद्या शिक्षकांवर मंडळाकडून प्रतिबंधात्मक कारवाई केली गेली असल्यास तसा त्यांच्या नावांसमोर ठळक अक्षरात उल्लेख करण्यात यावा.

7. **मुख्याध्यापक** प्रशासकीय कारणाने उत्तरपत्रिका तपासणीस नकार देतात. तथापि उत्तरपत्रिका तपासणीसाठी उपलब्ध शिक्षकांची संख्या विचारात घेता तसेच निकालाचे काम निर्धारित वेळेत पूर्ण होणेच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार या सर्वांना परीक्षन/नियमनाचे काम करणे बंधनकारक राहिल.

8. प्रामुख्याने अंशत: अनुदानित/ विनाअनुदानित शाळाबाबत असे दिसून येते की, उत्तरपत्रिकांचे गठ्ठे तपासणीसाठी प्राप्त झाल्यानंतर ऐनवेळी संबंधित शिक्षक शाळा सोडून गेल्याचे सांगतात. ही बाब अत्यंत गंभीर असून अशावेळी उत्तपत्रिका तपासून घेण्याची जबाबदारी सर्वस्वी मुख्यध्यापकांची राहील याची नोंद घ्यावी.

9. **महाराष्ट्र खाजगी शाळा सेवा शर्ती १९८१ नियम २२[ १ ]अनूसूची [ आ] मधील ४ [ १८,१९] नुसार सर्व शिक्षकांना मंडळाच्या परीक्षा अनुषंगिक सर्व कामे अनिवार्य आणि बंधनकारक आहे. तसेच जाणीवपूर्वक शिक्षक माहिती न पाठविणे / उत्तरपत्रिका गठ्ठा न तपासणे/परत पाठविणे/ अपूर्ण माहिती पाठविणे अशा सर्व घटनांबाबत सर्वस्वी जबाबदारी शाळाप्रमुख या नात्याने मुख्याध्यापकांवर राहिल.**

10. अनुदानित तसेच अंशत: विनाअनुदानित/विनाअनुदानित / स्वंयअर्थसहाय्यीत शाळातील सर्व शिक्षकांनी आपल्या नावासमोर योग्य त्या ठिकाणी **Teacher Type** बाबत ठळक अक्षरात तशी नोंद करावयाची आहे. (A/B/C/D पैकी)

**शास्त्र व तंत्र प्रात्यक्षिक परीक्षेसंदर्भात शिक्षक माहिती**

इयत्ता १० वी ची लेखी परीक्षा फेब्रुवारी/ मार्च २०२७ महिन्यात घेण्याचे निश्चीत केलेले आहे. तत्पूर्वी प्रात्यक्षिक परीक्षांचे नियोजन करणेच्या दृष्टीने **शास्त्र व तंत्र प्रात्यक्षिक** विषय शिक्षकांची माहिती तथा स्वीकृती पत्र या सोबत पाठविण्यात येत आहे. सदरहू माहिती परीपूर्ण भरुन घेवून संबंधितांच्या स्वाक्षरीसह **परीक्षक/नियामक यादीसोबत** या कार्यालयाकडे सादर करावयाची आहे.

वरील सर्व सूचना तथा माहिती सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून त्याप्रमाणे त्यांच्या नावांसमोर स्वाक्षरी घेण्यात यावी. **वरीलप्रमाणे शिक्षकांची परीपूर्ण माहिती कोणत्याही परिस्थितीत दिनांक २१/१०/२०२६ रोजी आपल्या वितरण केंद्रावर जमा करावयाची आहेत व कोल्हापूर शहर, कागल, शाहुवाडी, पन्हाळा, करवीर, गगनबावडा या तालुक्यातील शाळांनी उपरोक्त माहिती कोल्हापूर विभागीय मंडळ कार्यालयात जमा करावयाची आहे.** काही शाळा मुख्याध्यापक ठराविक शिक्षकांची नावे जाणीवपूर्वक वगळून यादी सादर करत असल्याचे **या कार्यालयास निदर्शनास आले आहे. यापुढे कार्यरत शिक्षकांची नांवे वगळल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित मुख्याध्यापकांवर म.खा.शा.क. (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील तरतुदीनुसार शिस्तभंग विषयी कारवाई प्रस्तावित केली जाईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.**

(गजानन उकिडे)
प्र.विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

**सोबत:** विहीत शिक्षक माहिती (लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा )

**प्रत माहितीस्तव: सर्व वितरण केंद्रप्रमुख (सातारा/सांगली/कोल्हापूर जिल्हा) - जमा झालेली स्वीकृती पत्रे शाळांच्याकडून दिनांक २१/१०/२०२६ रोजी तालुकानिहाय स्विकारून मंडळ कार्यालयात दिनांक २३/१०/२०२६ रोजी न चुकता जमा करावयाची आहेत.**